# प्रसिध्दी पत्रक

**श्री. रामेश्वर नारायण सोनत, वय ४५ वर्षे, नौकरी- अतिरिक्त कार्यकारी अभियंता भरारी पथक, महावितरण , औरंगाबाद रा. प्लॉट नं ९ , विंग A-२ , तापडीया पार्क, एन-४ सिडको औरंगाबाद यांचे विरुध्द लाचेची मागणी केल्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | **श्री. रामेश्वर नारायण सोनत, वय ४५ वर्षे, नौकरी- अतिरिक्त कार्यकारी अभियंता भरारी पथक, महावितरण , औरंगाबाद रा. प्लॉट नं ९ , विंग A-२ , तापडीया पार्क, एन-४ सिडको औरंगाबाद** |
| गुन्हयाची वेळ व ठिकाण | :- | दिनांक ०१/१२/२०१८ रोजी महावितरण कार्यालय, औरंगाबाद येथे |
| तपासी अधिकारी | :- | श्री.सचिन गवळी,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाचेची रक्कम मागणी | :- | २०,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे पकडण्यात आलेल्या विद्युत मीटर मधील वीज चोरी बाबतच्या दंडाची आकारणी कमी करण्यासाठी |

यातील तक्रारदार हे शेतीचा व्यवसाय करतात.त्यांचे राहत्या घरी महावितरण भरारी पथकाने अचानक पाहणी करुन विद्युत मीटर चेक करुन दोन्ही विद्युत मीटर जप्त केले. त्यानंतर तक्रारदार यांना भरारी पथकाचे प्रमुख श्री रामेश्वर नारायण सोनत, अतिरिक्त कार्यकारी अभियंता,यांनी त्यांचे महावितरण कार्यालय मिलकॉर्नर येथे बोलवुन सांगीतले की, तुमचे दोन्ही मीटर फॉल्टी असुन त्यात तुम्ही फेरफार केला आहे त्यामुळे तुम्हाला बील अत्यंत कमी येत होते. तुम्हाला सुमारे पाच लाख रुपये दंड येवु शकतो, तुम्हाला जर दंडाची रक्कम कमी करायची असेल तर त्यासाठी ५०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांची श्री रामेश्वर नारायण सोनत,यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०१/१२/२०१८ रोजी श्री रामेश्वर नारायण सोनत,अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय औरंगाबाद यांच्याकडे पंचसाक्षीदार समक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे पकडण्यात आलेल्या विद्युत मीटर मधील वीज चोरी बाबतच्या दंडाची आकारणी कमी करण्यासाठी रु २०,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आलोसे यांनी तक्रारदार यांच्याशी पत्यक्ष संपर्क करुन लाचेची रक्कम स्विकारन्यास नकार दिला होता.

तरी श्री.रामेश्वर नारायण सोनत, वय ४५ वर्षे, नौकरी- अतिरिक्त कार्यकारी अभियंता भरारी पथक, महावितरण,औरंगाबाद यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांचेविरुद्ध पोलीस ठाणे सिटीचौक,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**Mail ID :- dyspacbaurangabad@mahapolice.gov.in** २) dyspacbabad@gmail.com.

(सचिन गवळी)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते